GR-200404171253070002-0100

**सेवा प्रवेश नियम**
अगोदरच शासन सेवेत असलेल्यांना
नामनिर्देशनाने नियुक्तीसाठी वयोमर्यादा
विहित करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग ,
शासन परिपत्रक, क्रमांक : एसआरव्ही-२००२/३७९/प्र.क्र.२२/०२/१२,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक :१ नोव्हेंबर,२००३.

संदर्भ :- मुंबई नागरी सेवा, वर्गीकरण व सेवाप्रवेश नियम,१९३९.

# शासन परिपत्रक

मुंबई नागरी सेवा, वर्गीकरण व सेवा प्रवेश नियम -१९३९ मधील नियम-७ खालील टीप ३(ब) मधील तरतुदीनुसार नामनिर्देशनाद्वारे नियुक्तीसाठी शासन सेवेतील कर्मचा-याकरिता कमाल वयोमर्यादेच्या अटीमधून पूर्णतः सूट देण्यात आलेली आहे. शासकीय सेवेतील कर्मचा-यांकरिता अशी सूट यापुढेही देण्यात यावी किंवा कसे याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. याबाबत सर्वकष विचार करुन शासनाने असा निर्णय घेतला आहे की, यापुढे राज्य सेवेतील पदांकरिता नामनिर्देशनाद्वारे नियुक्तीसाठी शासन सेवेतील अधिकारी/कर्मचारी यांच्याकरिता वयाची पूर्णतः सूट देण्यात येऊ नये. तथापि ज्या पदाकरिता काही वर्षांचा अनुभव आवश्यक आहे, अशा पदांकरिता सेवा प्रवेश नियमात कमाल वयोमर्यादा + अनुभवाचा कालावधी इतपत किंवा पदाच्या विशेषज्ञतेनुसार व आवश्यकतेनुसार वयाच्या ४५/५० वर्षांपर्यंत अशी वयोमर्यादा शासन सेवेतील अधिकारी/कर्मचारी यांच्याकरिता विहित करण्यात यावी.

२. सर्व मंत्रालयीन विभागांना विनंती करण्यात येते की, त्यांनी आपापल्या कक्षेतील पदांच्या सेवा प्रवेश नियमात त्यानुसार तरतुद करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(बा.बा.नारायणकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबारहिल, मुंबई,
मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,

(कृ.मा.प.....

रोटा प्रिंट/एच–879(5000–11–03)1

उप मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मुख्य सचिव,
सर्व मंत्रालयीन विभागांचे सर्व अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव/सचिव,
सर्व मंत्रालयीन विभाग,
सामान्य प्रशासन विभाग/का.१३-अ,
नियोजन विभाग-कार्या-रोहयो-३,
वित्त विभाग/वित्तिय सुधारणा,
*प्रबंधक, मूळ शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
*प्रबंधक अपिल शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
*प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय,मुंबई,
*सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
*सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय (विधानसभा)मुंबई,
*सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय,(विधानपरिषद) मुंबई,
*राज्य निवडणूक आयुक्त, राज्य निवडणूक आयोग, नवीन प्रशासकीय भवन ,मुंबई,
*महालेखपाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र,मुंबई,
*महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर,
*महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा व परीक्षा), महाराष्ट्र,नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
मुख्य लेखा परीक्षक (निवासी लेखे) कोकण भवन, नवी मुंबई,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
निरनिराळया मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व
कार्यालय प्रमुख,
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती

* पत्राने.

---